# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी—४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (कुलसचिव कार्यालय)

एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली — ४४२६०५

फोन/फॅक्स नंबर ०७१३२—२२३१०४ **E-Mail** : gug.registrar@gmail.com


जा.क्र./गोंवीग/कुसका/ ४८५४ /२०२० दिनांक २३/०४/२०२०

प्रति,

मा. प्राचार्य,
सर्व संलग्नीत महाविद्यालये,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

विषय :— **महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ६० वा वर्धापन दिन समारंभ — १ मे, २०२० बाबत.**

संदर्भ :— १) शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण), पुणे यांचे पत्र क्रमांक उशिस/१मे/मवि—१/२०२०/४१०३ दि.२८.०.२०२०

२) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग यांचे शासन परिपत्रक क्रमांक : सीईआर—२०२०/प्र.क्र.६५/३० दि.१५.०४.२०२०

**महोदय,**

उपरोक्त संदर्भीय विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, कोरोना विषाणू संसर्ग टाळण्यासाठी यावर्षी राज्यात १ मे, २०२० महाराष्ट्र दिन हा कार्यक्रम अत्यंत साधेपणाने व मर्यादित स्वरूपात आयोजित करण्याबाबतच्या सुचना शासनाकडून प्राप्त झालेल्या आहेत. (कृपया अवलोकनार्थ)

करीता आपण आपल्या महाविद्यालयामध्ये १ मे, २०२० महाराष्ट्र दिन सोबत संलग्नीत शासन परिपत्रकाचे काटेकोर पालन करून साजरा करावा, ही विनंती.

संलग्न :— वरीलप्रमाणे.

(डॉ. ईश्वर मोहुर्ले)
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलिपी माहितीकरीता :—**

१. मा. कुलगुरु, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा. प्र—कुलगुरु, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीस्तव सविनय सादर.

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण),
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.
Web : www.dhepune.gov.in E-mail : mavi.dhepune@gov.in
फोन नं.०२०/२६१२२११९,२६०५१५१२,२६१३०६२७,२६१२४६३९ फॅक्स नं.०२०/२६१११११५३.

क्र.उशिंस/१ मे/मवि-१/२०२०/4103 दिनांक-२३/०४/२०२०.

ईमेलद्वारा

प्रति,

१ सर्व विभागीय शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य.

२ कुलसचिव
सर्व अकृषि/अभिमत/स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे.

**विषय:- महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ६० वा वर्धापन दिन समारंभ- १ मे, २०२० बाबत.**

संदर्भ:- सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक सीईआर २०२०/ प्र.क्र. ६५/३०
दिनांक १५ एप्रिल २०२०.

उपरोक्त विषयी आपणांस कळविण्यात येते की, कोरोना विषाणू संसर्ग टाळण्यासाठी यावर्षी राज्यात १ मे, २०२० महाराष्ट्र दिन हा कार्यक्रम अत्यंत साधेपणाने व मर्यादित स्वरुपात आयोजित करण्याच्या सुचना संदर्भीय शासन परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या आहेत.

तरी यानुसार आपल्या अधिनस्त सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/विना अनुदानित /कायमविनाअनुदानित/व मॉडेल डिग्री महाविद्यालये व परिसंस्था यांनाही आपल्या स्तरावरुन सूचित करण्यात यावे.

संदर्भीय शासन परिपत्रकाची प्रत सोबत जोडली आहे.

(डॉ.धनराज माने)
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ६० वा
वर्धापन दिन समारंभ - १ मे, २०२०

**महाराष्ट्र शासन**

सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : सीईआर-२०२०/प्र.क्र.६५/३०
राजशिष्टाचार शाखा, ३ रा मजला,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
तारीख : १५ एप्रिल, २०२०.

**शासन परिपत्रक**

महाराष्ट्र राज्य स्थापनेला दिनांक १ मे, २०२० रोजी ६० वर्षे पूर्ण होत आहेत. कोरोना विषाणूचा संसर्ग टाळण्यासाठी, यावर्षी राज्यात " **महाराष्ट्र दिन** " हा कार्यक्रम अत्यंत साधेपणाने आयोजित करण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे निदेश देण्यात येत आहेत:-

१. राज्यातील मंत्रालय व सर्व जिल्हा मुख्यालयातील जिल्हाधिकारी कार्यालये या ठिकाणी एकाच वेळी सकाळी ८.००वा. **फक्त ध्वजारोहण** करण्यात यावे.
२. या ठिकाणी केवळ पालकमंत्री, जिल्हाधिकारी, पोलिस अधिक्षक, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद एवढयाच पदाधिकारी/ अधिकारी यांनी उपस्थित रहावे.
३. इतर मान्यवरांना आमंत्रित करण्यात येवू नये.
४. कवायतीचे आयोजन करण्यात येवू नये.
५. विधीमंडळ,मा.उच्च न्यायालय व इतर संविधानिक कार्यालयांमध्ये कमीत कमी उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात यावे.
६. ध्वजारोहण करणारे पालकमंत्री महोदय काही अपरिहार्य कारणामुळे कार्यक्रमस्थळी उपस्थित राहू न शकल्यास, जिल्हा मुख्यालयी जिल्हाधिकारी यांनी ध्वजारोहण करावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

(रा.गो.गायकवाड)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-
मुख्य सचिव,
सर्व अपर मुख्य सचिव,
सर्व प्रधान सचिव / सर्व सचिव, मंत्रालयीन विभाग,
मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव,
मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,

Scanned with CamScanner